REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २४ नोव्हेंबर, १९४८ | अंक ४५


दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

**स्थापनाः १९२६**

मुख्य कचेरी :

**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था होत आहे.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B (वकील) (अध्यक्ष) | श्री. बी. बी. वाळवेकर (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B. }
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.

दि
## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

**पुणें २.**

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१२,७६० |
| खेळतें भांडवल | रु. ७०,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

**"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**बक्षिसाच्या बाँडसच्या चिठ्या**—हिंदुस्थान सरकारच्या पांच वर्षे मुदतीच्या विनाव्याज बाँडसच्या बक्षिसाच्या चिठ्या ता. १ डिसेंबर, १९४८ रोजीं मुंबई येथें जहांगिर हॉलमध्यें टाकण्यांत येतील. चिठ्या टाकण्याची ही दहावी खेप आहे.

**हिंदुस्थानसाठी नवी रेल्वे एंजिनें**—हिंदुस्थान सरकारनें वाफेवर चालणाऱ्या १०० रेल्वे एंजिनांची मागणी कानडा देशांतील एका कारखान्यांत नोंदविली आहे. ह्या एंजिनांची किंमत सुमारें १ कोटी, ४० लाख डॉलर्स इतकी होईल. किंमत अमेरिकन डॉलरच्या हुंडणावळींत देण्यांत येणार आहे. गेल्या दोन महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें कानडांत नोंदविलेली ही तिसरी मागणी आहे. हिंदुस्थान सरकारच्या एंजिनाच्या सर्व मागण्या मिळून कानडाला सुमारे ४ कोटी अमेरिकन डॉलर्सची हुंडणावळ मिळणार आहे.

**मॉस्कोंत हिंदी बोलपट**—मॉस्कोमधील हिंदी वकिलातींत रशिअन पाहुण्यांच्यासाठी "कल्पना" हा हिंदी बोलपट दाखविण्यांत आला. त्यावेळीं २०० प्रमुख रशिअन नागरिक हजर होते. सुप्रसिद्ध हिंदी नृत्यपटु उदयशंकर व त्यांच्या पत्नी ह्यांनीं पाहुण्यांचें स्वागत केलें.

**रशिआच्या अमेरिकन-निर्यातींत वाढ**—सध्या रशिया आणि अमेरिका ह्या दोन देशांत वाग्युद्ध चालू आहे. तथापि, गेल्या कांहीं महिन्यांत रशिआकडून अमेरिकेला जाणाऱ्या निर्यात मालांत मात्र वाढ झालेली आहे. ह्या निर्यातींत युद्धदृष्ट्या महत्त्वाच्या अशा वस्तू विशेष दिसून येतात. मँगेनीज आणि क्रोम ह्या दोन वस्तू त्या पैकींच आहेत. ह्या वस्तू रशिआ आपल्या गरजेपेक्षा अधिक निर्माण करतो. उलटपक्षीं अमेरिकेंत त्या तुलनेनें दुर्मिळ आहेत. अमेरिकन आंतरराष्ट्रीय व्यापार-खात्याचें यासंबंधीं असें मत आहे कीं, रशिआला डॉलर्सची चणचण भासत असल्यामुळें त्यानें हें निर्यात वाढीचें धोरण स्वीकारलें असावें.

**त्रावणकोरमध्यें टायर्सचा कारखाना**—हिंदुस्थानांतील सगळ्यांत मोठा टायर्सचा कारखाना त्रावणकोरमध्यें काढण्यासंबंधीं सध्या योजना विचारांत घेतली जात आहे. ह्या कारखान्याला सुमारें २ कोटी रुपयांचें भांडवल उभारावें लागेल, असा अंदाज आहे. कारखान्यांतील भांडवलापैकीं निम्मे भाग संस्थानच्या सरकारनें घ्यावे, अशी इच्छा कंपनीच्या प्रवर्तकांनीं व्यक्त केली आहे.

**अमेरिकेच्या निर्यातींत घट होणार**—अमेरिकेनें परराष्ट्रांच्या मदतीसाठी ७०० कोटी डॉलर्सचा वार्षिक कार्यक्रम मंजूर केलेला आहे. तथापि, १९४७ सालापेक्षा १९४८ सालीं अमेरिकेची ह्या कार्यक्रमापैकी निर्यात कमी होईल, असें समजतें. १९४७ मध्यें १,५३० कोटी डॉलर्स किंमतीच्या मालाची निर्यात झाली होती. त्यांत १९४८ सालीं १५ टक्क्यांची घट होईल, असें अमेरिकेच्या व्यापार खात्याच्या खुद्द डायरेक्टरानेंच जाहीर केलें आहे.

**पोलाद-मिश्र धातूचा कारखाना**—पोलादांत इतर खनिज धातू मिसळून विशिष्ट प्रकारचें पोलाद उत्पन्न करण्याचा पहिलाच कारखाना पाकिस्तानचें सरकार पश्चिम पंजाबांत काढणार आहे. ह्या कारखान्याला सुमारें १ लाख पौंड भांडवल लागेल. कारखाना शेफिल्डच्या एका ब्रिटिश कंपनीच्या मदतीनें उभारण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंत ब्रिटिश मोटारींना वाव**—फोर्ड, शेव्हरोलेट अगर प्लायमथ या अमेरिकन मोटारींच्या किंमतीपेक्षा ब्रिटिश बनावटीच्या गाड्यांची किंमत अधिक असून सुद्धा अमेरिकेंत ब्रिटिश गाड्यांची मागणी वाढत आहे. ब्रिटिश मोटारींना त्या लहान असल्यामुळें रस्त्यावर उभी करण्यास जागा थोडी लागते आणि त्यांना मैलागणिक पेट्रोलहि कमी लागतें. तथापि, अमेरिकन मोटारींचे कारखानेहि आता कॉसबी व बँटम ह्या सारख्या लहान मोटारी तयार करूं लागले आहेत. ह्या दोन्ही मोटारी ब्रिटिश मोटारींपेक्षा स्वस्त आहेत. परंतु गुणाच्या व इतर दृष्टीनें त्या तितक्या आकर्षक नाहींत, असें म्हणतात. निदान सध्या तरी ब्रिटिश मोटारींच्या अमेरिकेंतील खपामुळें ब्रिटनला पाहिजे असलेल्या डॉलर्सची प्राप्ती होत आहे.

**नागरी विमान वहातूक**—हिंदुस्थानांतील नागरी विमान वहातुकींत झालेल्या प्रगतीचा आढावा खात्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आला आहे. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीपेक्षा दुसऱ्या सहामाहींत वहातुकींत २५ टक्क्यांची वाढ झाली. विमानांचा प्रवास ५८,७४,३८० मैल झाला व १,७६,७३४ प्रवाशांनीं प्रवास केला. माल, पत्रें आणि वृत्तपत्रें ह्यांच्या वाहतुकींत २७ टक्क्यांची वाढ झाली. हिंदुस्थानांत नोंदलेलीं विमानें ५५१ होतीं, त्यांची संख्या ६१४ वर आली.


# चलनवाढ कमी करा.

चलनवाढ कमी करण्यास पैशांची बचत करा म्हणून आपल्या राष्ट्रीय सरकारचा आदेश आहे. अशा पैशांचा उत्तम विनियोग म्हणजे एकेरी किंवा मोठ्या हप्त्यांचे विमे घेणें. त्यामुळें चलनवाढ कमी होईलच, पण त्याबरोबर आपणांस मोठ्या रकमेचा विमाही मिळूं शकेल. सह्याद्रि विमा कंपनी लि. नासिक, ही संस्था आपल्या सेवेस सदैव तयार आहे. हप्ते कमी व भरपूर सवलती. योग्य कमिशनवर प्रतिनिधी पाहिजेत. अधिक माहितीसाठीं खालील कचेऱ्यांकडे लिहा अगर भेटा:—मुंबई, पुणें, कोल्हापूर, रत्नागिरी, बेळगांव, सावंतवाडी, कारवार, हुबळी, म्हापसे, मडगांव, नगर, धुळें, इंदोर, उमरावती, नागपूर, दिल्ली, बडोदें वगैरे.

गो. ग. सौंदणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २४ नोव्हेंबर १९४८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## साखरेच्या उत्पादनांत भरीव वाढ

### नियंत्रण काढल्यानंतर झालेली सुधारणा

१९४३–४६ सालाच्या मानानें १९४७–४८ मध्यें हिंदी साखर कारखान्यांनीं १९·२७% साखर अधिक उत्पादन केली. १३७ ऐवजीं १३५ कारखाने चालू होते तरी ही वाढ झाली. उसाला ज्यास्त किंमत दिल्या कारणानें, त्याचा ओघ गुळाच्या निर्मितीकडे न जाता तो साखर कारखान्यांकडे वळला व त्यामुळें गुळाची स्पर्धा बंद झाली. सहाजिकच, गुळाच्या उत्पादनाच्या प्रदेशांत म्हणजे पूर्व पंजाब, ओरिसा, इत्यादि ठिकाणीं उत्पादनांत विशेष प्रमाणांत वाढ दिसून येते. खालील तक्त्यांत साखरेच्या उत्पादनाचे प्रांतवार तुलनात्मक आकडे दिले आहेत:-

उत्पादनाचे तुलनात्मक आकडे

| प्रांत | १९४६-४७ टन | १९४७-४८ टन | वाढ % |
|---|---|---|---|
| सं. प्रांत | ५,२६,२०६ | ६,००,३४७ | १४·०९ |
| बिहार | १,४८,३२० | १,६८,४०५ | १३·५४ |
| प. बंगाल | ४,४१६ | ५,२१२ | १८·४८ |
| मुंबई | ६५,३९२ | ८९,४०७ | ३६·७२ |
| मद्रास | ५०,१७३ | ५९,८१९ | १९·१८ |
| पू. पंजाब | ८,०३९ | १२,३४८ | ५३·६० |
| ओरिसा | २,२६३ | ३,४५० | ५२·५४ |
| हिंदी संस्थानें | ९८,५३१ | १,३८,३७३ | ४०·५८ |
| सबंद हिंदुस्थान | ९,०३,३४० | १०,७७,३६१ | १९·२७ |

एकूण उत्पादनापैकीं संयुक्त प्रांत व बिहार ह्यांत ७३% उत्पादन होतें. संस्थानांतील उत्पादन १२·८४% व मुंबई प्रांतांतील उत्पादन ८·२९% आहे. बाकीच्या सर्व प्रांतांचा मिळून वांटा ७·५% आहे.

साखरेचें उत्पादन वाढलें, तरी उताऱ्याचें प्रमाण मात्र ९·८८% वरून ९·८५% वर आलें. हे आकडे संबद हिंदुस्थानांतील उताऱ्याचे आहेत, परंतु कांहीं प्रांतांत उताऱ्यांत फारच चांगली सुधारणा झाली. मुंबई प्रांतांत तो १०·३०% चा ११·३% झाला आणि बंगालमध्यें तो ९·६४% वरून १०·८८% वर गेला. बिहारमध्येंहि उताऱ्यांत वाढ झाली. संयुक्त प्रांतांतच साखरेचें बहुंशीं उत्पादन होत असल्या कारणानें तेथील उताऱ्यांत १०·०३% ची ९·८०% घट झाली त्याचा परिणाम हिंदी उताऱ्यावर प्रतिकूल झाला.

हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| | हिंदुस्थान | पाकिस्तान |
|---|---|---|
| साखर कारखाने | १३५ | ४ |
| कामाचे दिवस | १११ | ११० |
| गाळलेला ऊस ( टन ) | १,०९,४१,३१० | ३,३३,६८८ |
| तयार साखर ( टन ) | १०,७७,३६१ | २९,५८७ |
| मोलॅसेस ( टन ) | ४,१२,४२१ | १४,१३१ |
| साखरेचा उतारा ( % ) | ९·८५ | ८·८६ |
| मोलॅसेसचा उतारा ( % ) | ३·७७ | ४·२३ |

हिंदी साखरेची किंमत १५% ते २०% उतरण्याचा संभव आहे, अशी कानपूरची बातमी आहे. कारखाने ज्या दरानें ऊंस विकत घेतात, तो दर कमी करण्याचे बाबत संयुक्त प्रांत व बिहार ह्यांचेमध्यें एकमत झालें आहे. उसाला येत असलेल्या चांगल्या किंमतीच्या आकर्षणानें धान्याऐवजीं ऊंस लावण्याची लोकांची प्रवृत्ति झाली होती, तिला आळा घालण्यासाठीं संयुक्त प्रांत सरकारनें उसाची दरमणी किंमत उतरवून ती १ रु. ६ आ. केली. बिहार सरकारनें त्यास प्रथम संमति दिली नाहीं, ती पुढें दिली. कारखानदारांनींहि संमति देण्यापूर्वी थोडा विरोध केला होता. हिंदी साखरेच्या महर्गतेमुळें पाकिस्तानच्या बाजारपेठेस आपण मुकलों आहों. परदेशी साखरेच्या किंमती हिंदी साखरेपेक्षा जवळ जवळ निम्यानें कमी असल्यामुळें सध्याच्या महाग दरानें साखरेची निर्गत होऊं शकणार नाहीं व महर्गतेमुळें देशांतील उठावहि कमी होईल. तेव्हां, साखरेची किंमत थोडीतरी उतरणें क्रमप्राप्तच आहे.

---

**सोनेगांवचा विमानतळ**—नागपूर जवळील सोनेगांवच्या विमानतळावरील उड्डाणाच्या व इतर सोयी वाढविण्यांत येणार आहेत. त्यासाठीं ५ कोटी, ७१ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सभोंवतालच्या चार खेड्यांची जागा ह्या कामासाठीं सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे.

**मुंबईतील क्रूड ऑइल** :—मुंबईतील व्हिक्टोरिआ गोदीजवळ क्रूड ऑइलचा सांठा उघडकीला आल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. आतापर्यंत या भूमिगत सांठ्यांतून १० लाख गॅलन तेल बाहेर काढण्यांत आलें आहे. ह्या तेलाच्या मालकीबद्दल बॉंबे पोर्टट्रस्ट, जागेचा मालक आणि बर्मा शेल कंपनी ह्यांच्यांत वाद उत्पन्न झालेला आहे.

**धान्याचा किंमती कमी करा**—मुंबई सरकारचे अन्नमंत्री श्री. दिनकरराव देसाई हे वॉशिंग्टन येथील अन्न व शेतीविषयक परिषदेंत हिंदुस्थानतर्फे बोलतांना म्हणाले कीं, धान्य निर्यात करणाऱ्या राष्ट्रांनीं गरजेपेक्षां जास्त पुरवठा आहे अशी कल्पना करून धान्याच्या उत्पादनावर नियंत्रणें घालूं नयेत. त्यापेक्षा धान्याच्या किंमती कमी करणें हाच मार्ग स्वीकारावा.

**निर्वासितांना आधीं नोकरी द्या**—पाकिस्तानांतील स्थानिक स्वराज्य संस्थांतील जे नोकर निर्वासित म्हणून हिंदुस्थानांत आले असतील त्यांना प्रथम नोकरीवर घेण्यांत यावें अशी सूचना प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं आपआपल्या अधिकारांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना पाठविली आहे असें समजलें.

**आयर्लंड-ब्रिटनचे संबंध तुटले**—ब्रिटिश राजमुकुटाशीं असलेले संबंध संपूर्णपणें तोडून टाकून आयर्लंडनें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली आहे. यासंबंधीचें बिल आयरिश विधिमंडळांत अवघ्या दहा सेकंदांत आणि तेंही एकमतानें मंजूर करण्यांत आलें.

**शांततेचें नोबेल पारितोषिक यंदा नाहीं**—चालू वर्षीचें शांततेचें नोबेल पारितोषिक देण्यांत येणार नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

## ब्रिटिश राष्ट्रसंघांतील वसाहतींची सल्लामसलत

ब्रिटिश राष्ट्रसंघांतील राष्ट्रांच्या पंतप्रधानांची परिषद लंडनला नुकतीच झाली. महत्त्वाच्या विषयांची चर्चा करण्याचे असे प्रसंग सोडले, तर इतर वेळीं इंग्लंडचे मुख्य प्रधान आपल्या वसाहतींच्या पंतप्रधानांशीं दळणवळण कसें ठेवतात ? आपली कल्पना अशी होते कीं, मुख्य प्रधान मि. ॲटली सहजगत्या टेलिफोन उचलतात आणि समुद्रापलीकडील आपल्या सहकाऱ्यांशीं बोलणें करतात. परंतु तसें नाहीं; मि. ॲटली किंवा वसाहतींचे पंतप्रधान आपआपल्या मंत्रिमंडळाला जबाबदार असतात. अर्थातच, कोठल्याही विषयाची चर्चा करून मगच मंत्रिमंडळातर्फे बोलणीं होतात. हीं बोलणीं वैयक्तिक स्वरूपाचीं नसतात, तर तारेनेंच होतात. वसाहतींच्या पंतप्रधानांच्या परस्परांशीं वाटाघाटी निरनिराळ्या रीतीनें होऊं शकतात. त्यांत पुन्हा दोन भाग पडतात. एक म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांची परस्परांशीं बोलणीं; दुसरा राजकारणपटूंची एकमेकांशीं बोलणीं. वसाहतींनीं एकमेकांच्या देशांत हाय कमिशनर नेमणें, हा प्रकार पहिल्या भागांत मोडतो. हे हाय कमिशनर्स म्हणजे जवळ जवळ परराष्ट्रीय वकीलच म्हटलें तरी चालेल.

प्रत्येक हाय-कमिशनरच्या कचेरींत निरनिराळ्या खात्याचे सनदी नौकर असतात. उदाहरणार्थ, अर्थविषयक प्रश्न, परराष्ट्रीय संबंध, संरक्षण इत्यादी खात्यांचे सनदी नौकर. हे नौकर बहुधा दर आठवड्याला एकमेकांना बऱ्याच वेळा भेटतात आणि दैनंदिन व्यवहार पहातात. या शिवाय वरिष्ठ दर्जाचे सनदी नौकर वसाहतींना भेट देण्यासाठी जातात. ह्या सनदी नौकरांच्या संघर्षणामुळेंच वसाहती वसाहतींमधील संबंध निकटचे राहतात. तथापि, सनदी नौकर कांहीं धोरण ठरवूं शकत नाहींत. म्हणून, राजकार्यधुरंधरांच्या अधिक औपचारिक विचारविनिमयाची पद्धत ठेवलेली आहे. हे मुत्सद्दीच धोरण ठरविणारे असतात. त्यांच्या परस्परांतील विचारविनिमयाच्या पद्धती निरनिराळ्या प्रकारच्या असतात. एका वसाहतीचा पंतप्रधान दुसऱ्या पंतप्रधानाला तारा पाठवितो किंवा मंत्री एकमेकांच्या देशाला मधून मधून स्वतःच भेट देतात; किंवा सरकारतर्फे एकमेकांना खलितें पाठविले जातात; तशीच जरूर भासली तर कोठल्या तरी वसाहतीच्या राजधानींत वसाहतींचे मुख्य प्रधान स्वतःच जमतात. विचार-विनिमयाची अमुक एक पद्धत अशी ठरलेली नाही, किंवा धोरण ठरविण्यापूर्वी कोणत्याही वसाहत सरकारनें इतर वसाहत सरकारांशीं त्यासंबंधीं चर्चा केली पाहिजे असेंही नाहीं. उदाहरणार्थ, मि. बेव्हिन बऱ्याच वेळां परराष्ट्रीय धोरणाविषयीं जीं भाषणें करतात, त्यासंबंधीं इतर वसाहतींना २४ तासांच्या पेक्षां अधिक वेळ आगाऊ माहिती नसते. हें स्वातंत्र्य म्हणजे वसाहतींमधील संबंधांचा एक विशेष आहे. ह्या पद्धतीमुळें कांहीं फायदा होतो, तसा तोटाही होतो. परंतु कॉमनवेल्थ कमिटी पद्धतीमुळें तोटे त्याच प्रमाणांत कमी करण्यांत येत आहेत. सध्या अशा प्रकारच्या सुमारें वीस कॉमनवेल्थ कमिट्या आहेत. ह्या कमिट्यांतून सरकारी नौकर आणि मुत्सद्दी असे दोन्ही प्रकाराचे लोक असतात. कॉमनवेल्थमधील वसाहतींना धोरणाविषयीं सल्ला देण्याचें कार्य ह्या कमिट्या करतात. त्यामुळें प्रसंगी एकाच विषयासंबंधीं वसाहत राज्यांचे घटक एकमुखानें बोलूं शकतात. कमिट्यांपैकीं दोन कमिट्या विशेष महत्त्वाच्या आहेत. एक अर्थविषयक प्रश्नांसंबंधींची खास कमिटी आणि दुसरी संरक्षणासंबंधींच्या संशोधनाची एकसूत्रता राखणारी कमिटी. कॉमनवेल्थच्या वसाहतींच्या संरक्षणाचा आणि परराष्ट्रीय संबंधांचा विचार करणाऱ्या कमिट्यांची उणीव दिसून येते. ह्याचें कारण उघडच आहे. वसाहती स्वतंत्र राष्ट्रें असली तरी तीं लष्करी व आर्थिक दृष्ट्या ब्रिटनपेक्षा कमी दर्जाचीं आहेत. अर्थातच, परराष्ट्रीय राजकारणांत तीं ब्रिटनच्याच नेतृत्वाखालीं असतात. संरक्षणासंबंधी ब्रिगेडिअरच्या दर्जाचे लष्करी अधिकारी एकमेकांशीं देवाण-घेवाण करतात. ही देवाण-घेवाण मुख्यतः माहिती पुरविण्याच्या स्वरूपाची असते. दुसऱ्या महायुद्धानंतर इंपिरिअल डिफेन्स कमिटीचें विसर्जन करण्यांत आलें. त्या कमिटीची जागा अद्याप दुसऱ्या कशानें घेतलेली नाहीं. तथापि, वसाहतीमधील तरुण लष्करी अधिकाऱ्यांना ब्रिटनमधील लष्करी शाळांतून शिक्षण देण्याची व्यवस्था मात्र केलेली आहे. खुद्द ब्रिटिश साम्राज्यांत तीन प्रकारचे देश आहेत. एक प्रकार कॅनडा, ऑस्ट्रेलिआ सारख्या वसाहतींचें स्वराज्य भोगणाऱ्या देशांचा; दुसरा, आशिआंतील राष्ट्रांचा आणि तिसरा शुद्ध वसाहतींचा. अशा या तीन प्रकारच्या राष्ट्रांचीं धोरणें एका सूत्रांत गोवणें, हें कार्य अर्थातच तितकें सोपें नाहीं.

सर्वच वसाहतींना या सहकार्याच्या मार्गावर अजून बरीच वाट चालावयाची आहे.

("एकॉनॉमिस्ट" वरून)

---

**ब्रम्हदेशातील ब्रिटिश कंपन्या**—ब्रम्हदेशांतील ज्या ब्रिटिश कंपन्यांची मालमत्ता ब्रम्हदेश सरकारनें काढून घेतली, त्याबद्दलची योग्य नुकसानभरपाई देण्याचें त्या सरकारनें कबूल केलें होतें. १९४७ सालीं इंग्लंड आणि ब्रम्हदेश ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें वरील नुकसानभरपाई ब्रिटिश सरकार ब्रम्हदेशाच्या सरकारकडे मागत असल्याचें समजतें.

**युरोपांतील सर्वांत मोठें रेल्वे एंजिन**—पोलंडमधील एका मोठ्या रेल्वे एंजिनाच्या कारखान्यांत युरोपांतील सर्वांत मोठें रेल्वे एंजिन बांधलें जात आहे. तें ४९ फूट लांब व वजनाला ९८ टन आहे. १० पुलमन डबे ताशीं ६८ मैलांच्या वेगानें तें ओढूं शकेल. ह्या कारखान्यांत आतां युद्धपूर्वकालापेक्षा दरसाल चौपट अधिक एंजिनें तयार होतात. १९४८ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत कारखान्यांत ३२२ एंजिनें तयार झालीं.

**इंग्लंडांत माकडांची आयात**—ब्रिटननें कलकत्त्याहून नुकतींच २५० माकडें आणलीं आहेत. तीं कशासाठी आणलीं, असा प्रश्न पार्लमेंटमध्यें विचारला असता पुरवठा खात्याच्या मंत्र्यांनीं, कारण सांगणें लोकांच्या हिताचें नाहीं, असें उत्तर दिलें. त्यावर एका मजूर सभासदानें, ह्या माकडांवर युद्धांत वापरल्या जाणाऱ्या रोगजंतूंचा प्रयोग केला जाणार आहे काय ? अशी शंका विचारली.


**दी आदर्श कृषि संस्था लि.**
**नवगृही, धुळें.**

**संस्थेनें गेल्या वर्षी ६ टक्के डिव्हिडंड दिला**

== शेअर विक्री सुरू आहे ==

मुदतीच्या ठेवी स्वीकारणें आहेत.

१८ महिने—५ टक्के २४ महिने—५½ टक्के.

ठेवींवर शेअर होल्डर्सना ½ टक्का अधिक व्याज

पुर्णे सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान दुसरें : ७-११-४८

# देशोदेशींचा सहकार

( श्री. म. धों. विद्वांस, एम्. ए., एलूएल्. एम्. )

आपल्या देशाचें ध्येय कोऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ हें आतां ठरलें असल्यानें त्या दृष्टीनें वेगवेगळ्या देशांतील सहकारी चळवळींचें विहंगम दृष्टीनें विवेचन करून व्याख्याते म्हणालेः—

"वेगवेगळ्या व्यवहारांत स्पृहणीय चढाओढ ही असली पाहिजे तसेंच वैयक्तिक प्रयत्नांच्या विकासाला पूर्ण अवसर असला पाहिजे, हीं तत्त्वें आतां सर्वमान्य झालेलीं आहेत. कम्युनिझमच्या प्रचारकांना आपल्या मनाशी बाळगलेल्या ध्येयाशीं हीं तत्त्वें विसंगत दिसतात. तथापि समाजाच्या स्थैर्याचे दृष्टीनें विचार करतां सर्वमान्य झालेलीं हींच तत्त्वें शेवटीं प्रभावी ठरतात. कम्युनिझमचीं तत्त्वें जेथें अमलांत आणलीं जात आहेत त्या देशाच्या परिस्थितीवरून हें स्पष्ट होत आहे.

"इंग्लंडमध्यें सुमारें शंभर वर्षांपूर्वी सहकारी चळवळ प्रथम सुरू झाली ती लोकांच्या स्वयंप्रेरणमुळेंच होती. तसेंच अनियमित जबाबदारीवर जर्मनींत सुरू झालेल्या क्रेडिट सोसायट्या याही तेथील समाजाच्या स्वयंस्फूर्तीनेंच निर्माण झाल्या. सरकारनें त्या स्थापन करण्याचे कामीं पुढाकार घेतलेला नव्हता. इंग्लंडमध्यें ग्राहकांच्या सोसायट्या रॉकडेल व त्याचे मित्र यांनीं प्रथम सुरू केल्या. त्यांचा व्याप पुढें एवढा मोठा वाढला कीं, आपल्या सभासदांस लागणाऱ्या मालाचें उत्पादन त्या संस्था स्वतःच करूं लागल्या व त्यामुळें इंग्लंडांत प्रोड्यूसर्स सोसायट्या ह्या जीव धरूं शकेनात. डेन्मार्क व हॉलंड देशांची परिस्थिति या विरुद्ध होती. तेथें निर्माण होणारें दूध, लोणी वगैरे पदार्थ एकत्रित करून ते इंग्लंडमध्यें विक्रीसाठी पाठविले जात असत व त्यामुळें तेथें प्रोड्यूसर्स सोसायट्या जास्त प्रमाणांत स्थापन होऊं शकल्या. जर्मनींत शेतकऱ्यांना भांडवलाची जरूरी भासत असे व त्यामुळें तेथें क्रेडिट सोसायट्या स्थापन झाल्या. या सर्व संस्थांचा कारभार लोक-नियंत्रित असे. परंतु गेले लढाईचे पूर्वी युरोपांतील वेगवेगळ्या राष्ट्रांवर जी आर्थिक आपत्ति ओढवली त्यामुळें तेथील सोसायट्यांचें शासन हल्लीं तरी सरकारामार्फत चालू आहे.

"अमेरिकेंत क्रेडिट, प्रोड्यूसर्स अगर ग्राहक मंडळ्या विशेष प्रमाणांत स्थापन झालेल्या नाहींत; कारण त्या संस्थांची तेथील जनतेस गरजच नाहीं. परंतु शेतकऱ्यांनीं उत्पन्न केलेला माल फायदेशीर रीतीनें विकला गेला पाहिजे ही त्यांची विशेष गरज असल्यानें तेथें मार्केटिंग सोसायट्या फार मोठ्या प्रमाणांत स्थापन होऊं शकल्या व त्यांची वाढ होण्याच्या दृष्टीनें तेथील सरकारची त्यांना सर्व प्रकारें मदत मिळूं शकते. शेतकऱ्यांनीं आपला माल मार्केटिंग सोसायट्यांमार्फतच विकला पाहिजे अशी, विशिष्ट परिस्थितींत त्यांचेवर तेथील सरकार सक्तीही करूं शकते.

"रशियानें प्रथम अमलांत आणलेलीं सार्वत्रिक सक्तीचीं तत्त्वें हीं प्रभावी ठरत नाहींत असें अनुभवास आल्यानंतर व्यक्तींना आपल्या इच्छेप्रमाणें परंतु सहकारी पद्धतीनें आपलें जीवन जगण्यास परवानगी देणें हें तेथील सरकारास आतां जरूर वाटूं लागलें असून त्या दृष्टीनें तें आपलें धोरण आखत आहे.

"हिंदुस्थानांतील परिस्थिति पहातां, येथील सहकारी चळवळ म्हणजे सुधारलेली व नियंत्रित पद्धतीनें चाललेली सावकारीच होय, असें म्हणतां येईल. यापेक्षां जास्त विस्तृत दृष्टीनें या चळवळीची आपणाकडे अद्यापि प्रगति झालेली दिसत नाहीं. अलिकडे निर्माण झालेल्या परिस्थितीस तोंड देतां यावें म्हणून आपण आतां वेगवेगळ्या प्रकारच्या सोसायट्या काढूं लागलों आहों. कोऑपरेटिव्ह कॉमनवेल्थमध्यें परिणती व्हावी या दृष्टीनें सहकारी चळवळीचा यापुढील कार्यक्रम आपणास आखावा लागेल. मात्र तें ध्येय गांठण्याच्या दृष्टीनें ही चळवळ कंझूमर्सच्या हिताच्या दृष्टीनें चालली पाहिजे अगर प्रोड्यूसर्सच्या हिताच्या दृष्टीनें चालली पाहिजे तें यापुढें आपणास ठरवावें लागेल; तसेंच व्यक्तीच्या मालकीची संपत्ति असली पाहिजे ह्या सहकारी चळवळीस संमत असलेल्या तत्त्वास यापुढें कांहीं मुरड घालावी लागेल किंवा काय, हेंही भविष्य काळ ठरवूं शकेल."

---

### गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघ लि. कोपरगांव

संघाची सोळावी वार्षिक साधारण सभा तारीख ३०-९-४८ रोजीं कोपरगांव येथें संस्थेच्या ऑफिसमध्यें संस्थेचे चेअरमन श्री. गणपतराव रमाजी औताडे यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. सभेस सभासद व बिन सभासद मिळून एकूण ३००चे वर मंडळी हजर होती. संस्थेच्या पटावर एकूण सभासद ५५२ असून तिचें कार्यक्षेत्र कोपरगांव, बेलापुर व राहुरी या तीन तालुक्यांचें आहे. संस्थेचें खेळतें भांडवल पांच लाखांचें व एकूण जमा फंडस् रुपये १,७४,०००/-चे वर आहेत. बिल्डिंग फंड रुपये ५०,०००/-चे वर झालेला आहे. संस्थेच्या एकुण शाखा श्रीरामपूर, बेलापुर, राहुरी, या ठिकाणीं असून त्यांचे व्यवहार कोपरगांव येथील हेड्-ऑफिस मार्फत चाललेले असतात. संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या शेतींत तयार होणाऱ्या मालाची विशेषतः गूळ व भुसारची विक्री करणें व त्यांना शेतीस लागणारी खतें व बी-बीयाणें यांचा पुरवठा घाऊक किरकोळ दरानें खरेदी करून देणें—घेणेचा व्यवहार होत आहे. त्याचप्रमाणें, प्रांतांत व प्रांताबाहेरील गिऱ्हाइकांच्या सोसायट्यांना व व्यापाऱ्यांना त्यांचे मागणीप्रमाणें गूळ—भुसार खरेदी करून रवाना करून देण्याचें काम अडतीनें करीत आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रांतील कोणाही शेतकऱ्यास संस्थेचे सभासद होता येते व त्याप्रमाणें कार्यक्षेत्रांतील सहकारी सोसायट्याही सभासद असून सभेच्या तारखेपर्यंत ५० चे वर सहकारी सोसायट्याही सभासद असून दिवसेंदिवस ज्यास्त सोसायट्या सभासद होत आहेत. संस्थेचे चेअरमन श्री. गणतराव रमाजी पाटील औताडे पोहेगांव व त्यांचे सहकारी मॅनेजिंग कमेटीचे सभासद उत्तम तऱ्हेची कामगिरी पार पाडत आहेत. महात्मा गांधी निधी फंडास आपल्या नफ्यांतून रुपये दोन हजारची देणगी हेड् ऑफिस व शाखा मिळून तारीख ३०-९-४८ च्या जनरल मीटींगनें देण्याचे जाहीर केलें आहे, असें सेक्रेटरी श्री. जे. जी. भालेकर हे कळवितात.

---

### विलीन संस्थानांसाठी ऑ. ऑर्गनायझर्स

दाक्षिणेंतील व गुजरातमधील जीं संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन झालीं आहेत, त्यांच्या मुलुखांतील सहकारी चळवळीच्या प्रसाराकरितां सहकारी सोसायट्यांचे जिल्हा व तालुका ऑनररी ऑर्गनायझर नेमण्यांत येणार आहेत. ह्या नेमणुकांसाठी चीफ ॲडमिनिस्ट्रेटर्स व कलेक्टर्स ह्यांच्या सल्ल्यानें विलीन भागाचे असिस्टंट रजिस्ट्रार नांवें सुचवितील.

### निंबूत वि. कार्यकारी सोसायटीस शेतकी मंत्र्यांची भेट

ता. १३-११-४८ रोजीं शेतकी मंत्री श्री. एम. पी. पाटील हे रा. ब. शेंबेकर यांचे निंबूत बेटांतील बागेची पाहाणी करण्यासाठीं आले असतां तेथील कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनीं निंबूत विविध कार्यकारी सहकारी सोसायटीस डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर व इतर आधिकारी यांचे समवेत भेट दिली. सदर भेटीच्या वेळीं सभासद व बिगर-सभासद मिळून सुमारें ५०० शेतकरीसमुदाय हजर होता. निंबुत सोसायटीच्या व्यापक कार्याचा अहवाल मॅनेजर श्री. जी. बी काटकर यांनीं वाचून दाखविल्यानंतर नामदारसाहेबांनीं संस्थेच्या कार्याबद्दल आनंद व्यक्त करून चालकांचें अभिनंदन केलें व शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सहकारी तत्त्वावर सुटले जावेत असें सांगून शेतकऱ्यांनीं त्या दृष्टीनें वागणेंबद्दल मार्गदर्शन केलें. नंतर सोसायटीचे चेअरमन श्री. मुगुटराव साहेबराव काकडे यांनीं नामदारसाहेबांचें व आलेल्या आधिकारी मंडळींचे, तसेच शेतकरीबंधूंचे आभार मानल्यानंतर पुष्पहार होऊन महात्माजींच्या जयघोषांत हा भेटीचा कार्यक्रम संपला, असें सोसायटीचे सेक्रेटरी श्री. लालासाहेब बाळासाहेब जगताप हे कळवितात.

### दि नगर डि. अर्बन सें. को. बँक लि., अहमदनगर

वरील बँकेस अहवालाचे वर्षी ४१,६५२ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला १२,६७७ रु. लागले. बँकेच्या सर्व शाखा नफ्यांत आहेत. वांबोरी, शेवगांव, वगैर व्यापारी केंद्रांत शाखा उघडण्याची लवकरच तजवीज करण्यांत येईल. बँकेनें निर्वासितांसाठीं काहीं महिने,दुकानें चालविलीं. बँकेनें वाढत्या व्यवहारासाठी सध्यांच्या इमारतीचे उत्तरेकडील १७०४ चौ. फू. जागा विकत घेतली आहे. बांधकामास लवकरच प्रारंभ होईल. नवीन सेफ डिपॉझिट व्हॉल्टहि बांधण्यास लवकरच प्रारंभ होईल. बँकेचा ताळेबंद ७२ लक्ष रुपयांचा आहे. वसूल भांडवल ३ लक्ष, १५ हजार रु. असून रिझर्व्ह फंड २ लक्ष, २३ हजार रु. आहे. इतर फंडांत १ लक्ष, ६३ हजार रु. आहेत. (चेअरमनः श्री. मो. कुं. फिरोदिया, बी. ए.; मॅनेजर ऑन. स्पे. ड्यूटी: श्री. कृ. ज. जोशी; मॅनेजरः श्री. त्र्यं. वि. निसळ, सी. ए. आय. आय. बी.)


## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

**पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.**

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–

ब्रँच सेक्रेटरी

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**– शेड्यूल्ड बँक –**

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

**संचालक मंडळ**

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन )
श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन )

| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. मो. रा. ढमढेरे |

**ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.**

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २ } **चिं. वि. जोग,** मॅनेजर.

व्यापारविषयक मराठी मासिक

## —व्यापार उद्योग—

**२ रें वर्ष सुरू झालें.**

—महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति करायची ना ?

—सर्वांना सहजसुलभ व शक्य व्हावें म्हणून मासिकाची वार्षिक वर्गणी सहा ( ६ रु. ) केली आहे.

[ यांत खास **दिवाळी अंक** (१ रु. ) १ खास अंक ]

**किरकोळ अंक ८ आणे. पानें ४८**

**आजच वार्षिक वर्गणीदार व्हा.**

**जाहिरातीचें उत्कृष्ट साधन.**

नमुना अंकाकरितां ९ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

**मोहाडीकर बंधू,** व्यवस्थापक.
१०, गंगानिवास, रानडे रोड,
दादर, मुंबई नं. १४.






## प्राप्तीवरील कराबाबत प्रीव्ही कौन्सिलचा महत्त्वाचा निर्णय.

( १ ) परकीयांच्या बाह्यदेशीय उत्पन्नावर कर-आकारणी केव्हां करता येते ?

( २ ) तटस्थ भागीदारांना करापासून मुक्तता असते काय ?

मुंबईला 'वॅलेस ॲन्ड को.' ही भागीदारी पेढी व्यापारधंदा करीत असते. या पेढीची एक भागीदार 'वॅलेस ब्रदर्स को. लि.' या नांवाची एक कंपनी असून ती इंग्लंडमध्यें नोंदविण्यांत आलेली आहे व तिची अधिकृत कचेरीहि इंग्लंडमध्येंच आहे. मुंबईच्या वॅलेस ॲन्ड को. या पेढीच्या व्यवस्थेमध्यें सदरील भागीदार कंपनी कोणत्याहि प्रकारचा भाग घेत नाहीं. ती कंपनी फक्त तटस्थ भागीदार ( स्लीपिंग पार्टनर ) आहे. १९३८-१९३९ ह्या सालीं सदरील कंपनीला वरील कंपनीच्या भागीदारीबद्दल १७,८५,८३१ रुपयांचें उत्पन्न हिंदुस्थानांतून मिळालें; आणि त्या कंपनीचें हिंदुस्थानाबाहेरील उत्पन्न ७,४८,४२७ रुपये होतें. अशा प्रकारें सदरील कंपनीचें हिंदुस्थानांतील उत्पन्न तिच्या हिंदुस्थानाबाहेरील उत्पन्नापेक्षां खूपच जास्त असल्यामुळें मुंबईतील अधिकाऱ्यांनीं त्या कंपनीच्या हिंदुस्थानाबाहेरील ७,४८,४२७ रुपयांच्या बाह्यदेशीय उत्पन्नावरही प्राप्तीवरील कराची आकारणी केली. तेव्हां ती गोष्ट न मानवून कंपनीनें सदरचें प्रकरण प्रथम मुंबई हायकोर्टाकडे व नंतर फेडरल कोर्टाकडे नेलें. त्या दोन्हीहि कोर्टांचे निकाल कंपनीच्या विरुद्ध गेल्या कारणानें शेवटीं फेडरल कोर्टाच्या परवानगीनें कंपनीनें हा प्रश्न इंग्लंडमधील प्रीव्ही कौन्सिलकडे नेला.

ह्या प्रकरणांतील मुख्य विवाद्य प्रश्न दोन होते, ते असे:-

( १ ) हिंदुस्थानांत रहिवासी नसलेल्या लोकांच्या बाह्यदेशीय उत्पन्नावर कर–आकारणी करणें हिंदुस्थानच्या कायदेमंडळांच्या अधिकारा बाहेरचें नाहीं काय ? आणि

( २ ) तटस्थ भागीदारावर कराची आकारणी करतां येईल काय ?

ह्या प्रश्नांवर प्रीव्ही कौन्सिलनें पुढीलप्रमाणें मतप्रदर्शन केलें आहे:—

( १ ) कायद्याचे दृष्टीनें कंपनीची अधिकृत कचेरी ( रजिस्टर्ड ऑफिस ) ज्या प्रदेशांत असेल तेथें त्या कंपनीचें वास्तव्य समजलें जातें व त्या प्रदेशाच्या सरकारला त्या कंपनीवर कर आकारतां येतात. परंतु कोणाहि माणसास अथवा कंपनीस मिळणारें उत्पन्न ज्या प्रदेशांतून मिळतें त्या प्रदेशांतील सरकारच्या कायदेमंडळासहि त्या उत्पन्नावर कर बसविण्याचा अधिकार असतो. वॅलेस ब्रदर्स ॲन्ड को. लि. या कंपनीच्या एकूण उत्पन्नाच्या फार मोठ्या भागाचा प्रादेशिक संबंध हिंदुस्थानशीं आहे. सामान्य व्यक्तींपेक्षा कंपन्यांची गोष्ट वेगळी असते. कंपन्यांना फक्त आर्थिक अस्तित्व तेवढें असतें. पैसा मिळवणें व खर्च करणें या व्यतिरिक्त त्यांना अन्य कार्य असूं शकत नाहीं. ह्मणजेच पैसा हाच त्यांचा प्राण असतो व म्हणून तो पैसा जेथें पैदा होतो त्या प्रदेशाशीं कंपन्यांचा संबंध जिव्हाळ्याचा असतो. जेव्हां एकाद्या वर्षीचे, एकाद्या कंपनीचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत एकाद्या देशांत पैदा झालेलें असतें तेव्हां त्या कंपनीनें त्या वर्षी त्या देशांत आपली पाळेंमुळें रोवून वास केला असेंच समजणें प्राप्त आहे. अशा प्रकारें पैदाशीमुळें येणारा प्रादेशिक संबंध हा निदान कंपनीचा कारभार ज्या कचेरींत चालावयाचा त्या कचेरीच्या स्थानामुळें येणाऱ्या प्रादेशिक संबंधाइतका समबल तरी ठरतोच! शिवाय कारभाराची कचेरी ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सहज नेता येतें. उत्पन्नाची पैदास जेथें व्हावयाची तो प्रदेश कांहीं असा हवा तसा व हवा तेव्हां बदलता येणें सुलभ नसतें. तेव्हां उत्पन्नाचा प्रादेशिक संबंध हा बलवत्तर ठरतो म्हणून कंपन्यांच्या कार्याच्या योजना जेथें स्फुरतात व आंखल्या जातात त्या प्रदेशाइतकाच ज्या ठिकाणीं कंपनीच्या उत्पन्नाची प्रत्यक्ष पैदास होते त्या प्रदेशाचा संबंधहि महत्त्वाचा ठरतो. सारांश, ज्या प्रदेशांतील उत्पन्नावर एकादी कंपनी वस्तुतः जगत असते त्या देशांतहि तिचें वास्तव्य असतें असें मानणें प्राप्त आहे. मग त्या कंपनीची अधिकृत कचेरी कोठें का असेना! अशा प्रकारें ज्या कंपनीच्या उत्पन्नाचा फार मोठा भाग हिंदुस्थानांत पैदा होत आहे त्या कंपनीच्या सर्व एतद्देशीय व बाह्यदेशीय उत्पन्नावर कराची आकारणी करणें हें हिंदुस्थानच्या कायदेमंडळाच्या अधिकार–कक्षेत निःसंशय आहेच आहे.

( २ ) त्यानंतर दुसऱ्या प्रश्नाबद्दल वॅलेस ब्रदर्स ॲन्ड को. लि. या कंपनीचें म्हणणें असें होतें कीं वॅलेस ॲन्ड को. या पेढीच्या हिंदुस्थानांतील कारभारांत अथवा व्यवस्थेंत कंपनी कोणत्याहि प्रकारचा भाग घेत नाहीं. ती सदर पेढीची फक्त तटस्थ भागीदार ( स्लीपिंग पार्टनर ) आहे. म्हणून कंपनीच्या उत्पन्नावर कराची आकारणी होऊं नये. परंतु प्रीव्ही कौन्सिलला कंपनीच्या ह्या म्हणण्यास कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर आधार आढळला नाहीं. भागीदारांच्या कायद्यांतही या युक्तिवादास स्थान नाहीं. भागीदारीच्या व्यवहारांत प्रत्येक भागीदारानें मन घातलेंच पाहिजे असा कांहीं कायदा नाहीं. भागीदारींतील प्रत्येक भागीदार हा दुसऱ्या सर्व भागीदारांचा प्रतिनिधी व मुखत्यार असतो आणि तो भागीदारांचा जो काय कारभार पहातो, तो स्वतःच्या वतीनें व इतर सर्व भागीदारांच्याही वतीनें पहात असतो. म्हणून एकाद्या भागीदारानें भागीदारीच्या व्यवहारांत लक्ष घातलें नाहीं अथवा भाग घेतला नाहीं, तरी त्याचा अर्थ तो भागीदारीचा व्यवहार करीत नाहीं असा होत नाहीं. भागीदारीच्या कायद्याचें व व्यवहाराचें स्वरूपच अशा प्रकारचें नाहीं. तेव्हां तटस्थ भागीदारावरहि प्राप्तीवरील कराची आकारणी करणें पूर्णपणें कायदेशीर व न्याय्य आहे.

( ऑ. इं. रि. १९४८ प्रीव्ही कौन्सिल ११८ )

---

### " ह्या महिन्यांतल्या आर्थिक घडामोडी "

वरील विषयावर श्री. श्री. बा. काळे, संपादक " अर्थ " ह्यांचें मंगळवार, ता. ३० रोजीं संध्याकाळीं ७-३० वाजतां मुंबई नभोवाणीवर भाषण होणार आहे.

### वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीच्या पुणें शाखा कचेरीच्या कक्षेतील एजंट मंडळींचें वार्षिक स्नेहसंमेलन व कंपनीचे विद्यमान चेअरमन डॉ. मो. ना. आगाशे ह्यांस नुकतेंच ६१ वें वर्ष लागलें त्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ शनिवार ता. २० रोजीं पुणें येथें करण्यांत आला. डॉ. बा. चिं. लागू हे अध्यक्षस्थानीं होते.

### कॉमनवेल्थ स्टाफ असोसिएशन, पुणें

कॉमनवेल्थ स्टाफ असोसिएशनच्या वार्षिक स्नेहसंमेलनामधील चढाओढींचा बक्षीस समारंभ व असोसिएशनच्या विद्यमानें कंपनीचा २० वा वाढदिवस श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचे अध्यक्षतेखालीं शनिवार, ता. २० रोजीं साजरा करण्यांत आला.

### द. आफ्रिकेच्या सोन्याचें अमेरिकन गिऱ्हाइक

दक्षिण आफ्रिकेनें १९४८ मध्यें आतापर्यंत ग्रेट ब्रिटनला जेवढें सोनें विकून पाठवलें, त्याच्या चौपट सोनें अमेरिकेस दिलें. अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनपेक्षा ११% भाव ज्यास्त दिला.

## औद्योगिक उत्पादनांत स्वागतार्ह वाढ

देशांतील चलनवृद्धीला आळा घालण्याच्या कामांत हिंद सरकार मुख्यतः उत्पादनाच्या वाढीवर अवलंबून आहे. १९४८ सालांतील उत्पादनाच्या आंकड्यांवरून त्यांत वाढ होत असल्याचें दिसून येत आहे. सप्टेंबर १९४८ अखेर संपलेल्या तिमाहींत कापडाचें उत्पादन ११५·२कोटी वार झालें. मुंबईंतील कापडाच्या गिरण्यांनीं ऑक्टोबर १९४८ मध्यें गेल्या ऑक्टोबरपेक्षा १६ टक्के अधिक कापूस उपयोगांत आणला. डिसेंबर अखेर हिंदुस्थानांतील कापडाच्या गिरण्या ४५० कोटी वार कापडाचें उत्पादन करून ह्या वर्षाच्या उत्पादनाचें आपलें ध्येय गांठतील, असा अंदाज आहे. ताग, पोलाद आणि साखर ह्यांच्या उत्पादनांतही वाढ दिसून येत आहे. सप्टेंबर, १९४८ मध्यें तागाच्या गिरण्यांनीं ९,००० टन माल तयार केला. गेल्या कित्येक महिन्यांपेक्षा हें उत्पादन अधिक आहे. ह्या सालांतील तिसऱ्या तिमाहींत तागाच्या गिरण्यांनीं २,७४,००० टन माल निर्माण केला. हें उत्पादन त्याच्या पूर्वीच्या तिमाहीपेक्षा ३०,००० टनांनीं अधिक आहे. निर्यातीच्या मालांतील एक प्रमुख जिन्नस जो चहा त्याच्याहि उत्पादनांत वाढ झाली आहे. ह्या सालीं ५५ कोटी पौंड चहा उत्पन्न होईल, असा अंदाज आहे. साखरेच्या वार्षिक उत्पादनांतही गेल्या वर्षीपेक्षा २,००,००० टनांची वाढ होईल, असा अंदाज आहे साखरेचें एकूण उत्पादन १० लाख, ८० हजार टनांवर होईल. पोलादाच्या उत्पादनाचीही परिस्थिति सुधारत आहे. गेल्या दहा महिन्यांत कोठल्याही महिन्यांत झालें नाहीं, येवढें म्हणजे ६०,००० टन पोलाद जमशेटपूरच्या कारखान्यांत तयार झालें. चालू तिमाहींत पोलादाचे कारखाने २,५०,००० टन पोलाद निर्माण करूं शकतील. गेल्या सहा महिन्यांत कोळशाचें उत्पादन घटलें होतें. वर्षाच्या तिसऱ्या तिमाहींत उत्पादन ६७,१०,००० टन झालें. चालू तिमाहींत ते ७५,००,००० टन होऊन ह्या वर्षीचें एकूण उत्पादन ३ कोटी टनांवर जाईल.

## बँक ऑफ इंग्लंडच्या डायरेक्टरांत बँकेच्या नोकर-संघाचा प्रतिनिधी ?

मारगेट येथें ब्रिटिश ट्रेड युनिअन काँग्रेसचें अधिवेशन सप्टेंबर-मध्यें भरलें होतें. अधिवेशनांत बँकांच्या नोकर संघाच्या वतीनें अशी मागणी करण्यांत आली कीं, बँक ऑफ इंग्लंडच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सवर संघाचा एक प्रतिनिधी घेण्यांत यावा. परंतु ही मागणी संमत झाली नाहीं; त्याविषयींचा ठराव नामंजूर करण्यांत आला. तथापि, ठरावाला विरोध करतांना ट्रेड युनिअन कौन्सिलच्या एका प्रवक्त्यानें अशी माहिती सांगितली कीं, बँकेच्या कोर्टावर एकादी जागा रिकामी झाल्यास ट्रेड युनिअन कौन्सिलला तसें कळविण्यांत येईल असें आश्वासन खाजगी रीतीनें चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर ह्यांनीं दिलें आहे. बँक ऑफ इंग्लंडचें राष्ट्रीयीकरण झाल्यापासून, कोर्टावरील सभासदांची नेमणूक राजा करतो. त्यामुळें वरील आश्वासन जरा विचित्र वाटल्याशिवाय रहात नाहीं. तथापि, ह्या आश्वासनामुळें राष्ट्रीयीकरण झालेले इतर उद्योगधंदे आणि बँक ह्यांच्यांत एक प्रकारची समानता उत्पन्न झाल्यासारखी दिसते. कारण, राष्ट्रीयीकरण झालेल्या इतर उद्योगधंद्यांच्या बोर्डावर नोकर संघाचे प्रतिनिधी आहेत.

**भवभूतींचें स्मारक**— गोंदिआ येथ भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनांत संस्कृत महाकवि भवभूति ह्याचें स्मारक करण्याचें ठरलें. भवभूति हा भंडारा जिल्ह्यांतलि पदमपूर या गांवचा रहिवासी होता. हें गांव बंगाल-नागपूर रेल्वे रस्त्यावरील आमगांव स्टेशनपासून थोड्या मैल अंतरावर आहे. त्या गांवींच स्मारक उभारण्यांत येणार आहे.


सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
[ स्थापना १९१८ ]




टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,१३,६१० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् ... | रु. २,५१,४०० |
| ठेवी ... | रु. ८६,७९,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ९४,३३,००० |

बचतीच्या आकर्षक योजना
— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन
एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## साखर कारखान्यांना ऊस-पट्टी कां नको?

### डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनची तक्रार

साखर कारखान्यांत गाळलेल्या उंसावर पट्टी बसविण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. त्यामुळें सरकारला दरसाल ४० लक्ष रु. मिळणार आहेत. (पहा: अर्थ ता. २०-१०-४८) ह्यासंबंधीं डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशननें आपलें म्हणणें अर्थमंत्र्यांचे पुढें मांडलें, तें खालीलप्रमाणें आहे:—

"ही पट्टी अयोग्य व त्रासदायक आहे, अशी असोसिएशनची तक्रार आहे. दक्षिणेंतील कालवे किफायतशीर होत नव्हते त्यावेळीं उपाययोजना म्हणून कामत कमिटीच्या शिफारसीप्रमाणें सरकारनें साखर कारखान्यांना खास सवलती देऊं केल्या आणि ३० वर्षें मुदतीचे त्यानें कारखान्यांशीं करार केले. त्यांचा व संरक्षणाचा फायदा घेऊन कारखानदारांनीं आपलें भांडवल गुंतवून साखर कारखाने स्थापन केले. १९३३ ते १९३९ हा काळ तर मंदीचाच होता. १९३९ नंतरच्या युद्धकाळांत, नियंत्रणाखालीं येणाऱ्या धंद्यांत साखरेचा धंदाच पहिला होता. त्यामुळें युद्धकाळांत साखर कारखान्यांस भरमसाट नफा झालेला नाहीं. आज त्यांना जो नफा झालेला दिसतो, तो दोन वर्षांपूर्वीच्या परिस्थितीचा परिणाम आहे. त्याचा आधार घेणें सयुक्तिक होणार नाहीं. पट्टी बसवितांना दक्षिणेंतील कारखान्यांस असणाऱ्या अनुकूल बाबींप्रमाणें प्रतिकूल बाबींचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. ह्या प्रतिकूल बाबींसाठी पुरेशी गंगाजळी निर्माण करून ठेवणें साखर कारखान्यांस अद्याप शक्य झालेलें नाहीं. पाणीपट्टी व खंड ह्यांच्या मुदतीइतकेंच ह्या धंद्याचें आयुष्य असल्याकारणानें, त्या मुदतींतच त्याला आपला गुंतलेला पैसा काढून घेण्यास मोकळीक पाहिजे. कांहीं कारखान्यांनीं लिफ्ट इरिगेशनसाठीं मोठें भांडवल गुंतवलें, अशा पाणी पुरवठ्यास उत्पादन खर्चहि अधिक असतो. उसावरील पट्टीनें ह्या कारखान्यांवरील बोजांत आणखी भर घातली आहे. पाण्याचे करार कंपन्यांनीं सरकारशीं केलेले आहेत. त्यांत साखर कारखान्यांत इतरांपेक्षा ज्यास्त पाणीपट्टी द्यावी लागणार नाहीं, असा अर्थ अभिप्रेत आहे. उसावरील प्रस्तुत पट्टी म्हणजे पाणीपट्टींतच एक प्रकारची वाढ आहे. पट्टीच्या विनियोगाविषयीं सरकारनें जें सांगितलें आहे, तें पटण्याजोगें नाहीं. कारखाने मोठ्या प्रमाणावर ऊंस लावतात व त्यांना स्वतःच सुधारणेसाठीं संशोधनावर खर्च करावा लागतो. त्याचा फायदा इतर बागाइतदारांनाहि मिळतो. फॅक्टरी एरियांतील रस्त्यांवरहि कारखानेच खर्च करतात. शेतीच्या सर्वसाधारण सुधारणेचा फायदा सबंद प्रांतासच होणार आहे, त्याचा बोजा एकट्या साखरेच्या धंद्यावर का टाकण्यांत यावा? ह्या बाबतींतील अन्याय, पट्टीची आकारणी १ जानेवारी, १९४८ पासून करण्याचे ठरवून, अधिकच वाढला आहे. लायसेन्सची पद्धत तर कारखानदारांना अपमानास्पद वाटते. न्यायमंदिराकडे न्यायासाठी जाण्यास कायद्याच्या ८ व्या कलमानें बंदी केली आहे. ७ व्या कलमांतील अपिलांची तरतूद पुरेशी नाहीं."

**पासपोर्टाला शेऱ्याची जरूर नाहीं**—अमेरिकेंतून इंग्लंडला जाणाऱ्या प्रवाशांना यापुढें फक्त प्रवासाच्या परवान्याचीच आवश्यकता लागेल. तो बरोबर असल्याचा ब्रिटिश अधिकाऱ्याचा शेरा लागणार नाहीं. ही व्यवस्था केवळ सदिच्छा दाखविण्यासाठी ब्रिटिश परराष्ट्रीय खात्यानें मंजूर केली आहे. त्याबद्दल वेगळ्या वाटाघाटी अशा झालेल्या नाहींत. ब्रिटिश नागरिकांना मात्र अमेरिकेंत उतरल्यावर तेथील अधिकाऱ्यांचा पासपोर्ट ठीक असल्याचा शेरा पूर्वीप्रमाणें घ्यावा लागेल.


नवीन पुष्कळ निघाले, तरी

**तुळजाराम मोदी, सातारा**

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार









श्री श्री श्री श्री श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
–खादीचें माहेरघर–
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.